संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२८३/२०१५

महाराष्ट्र शासन वि. सचिन जाधव

निशाणी - १३/क

**साक्षीदार क्रमांक १ यांचा उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.डी. फदाट यांचे मार्फत शपथेवर सुरु**

०३. हे म्हणणे खरे आहे की, देवगिरी व्हॅली समोरचा रस्ता म्हणजे पडेगाव गावातील रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्ता वेरुळ, खुल्ताबाद, नाशिक, वैजापुर रस्ता असुन त्यावर सतत वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता हा एक पदरी आहे. सदर रस्त्याच्या आजुबाजुला हॉटेल आहे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता हा गावातील असल्यामुळे वाहने हळुहळु चालतात. हे म्हणणे खरे आहे की, गाव असल्यामुळे मधेच कोणी येत म्हणुन वाहने हळुहळु चालतात. हे म्हणणे खरे आहे की, संध्याकाळच्या वेळेस सदर ठिकाणी वाहतुक असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणाची फाईल मी कोर्टात आल्यानंतर बघितली. सदरचा रस्ता हा एकपदरी असल्याने त्यावर खड्डे आहेत हे मला माहित नाही. सदरचा रस्ता हा गावातील असल्याने गावामध्ये सी.सी.टि.व्ही. आहे हे मला माहित नाही. माझ्याकडे असणा-या ॲक्टीव्हा वाहनाचे कागदपत्र पोलिसांनी माझ्याकडे मागितले नाहीत. माझ्याकडे पोलिसांनी वाहनाचा परवाना मागितला नाही म्हणुन मी दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही गाडीवर ट्रिपल सीट होतो. हे म्हणणे खरे नाही की, गाडीवर ट्रिपल सिट असल्याने व गावात खड्डे असल्यामुळे गाडीचा तोल जाउ शकतो. हे म्हणणे खरे आहे की, ट्रिपल सीट चालवणे कायद्याने गुन्हा आहे. हे म्हणणे खरे आहे की, ट्रिपल सीट गाडी चालवणे गुन्हा आहे हे माहित असतांना देखील मी गाडी चालवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गाडीवर ट्रिपल सीट असल्याने गाडीचा तोल गेला व खड्ड्यात पडलो. हे म्हणणे खरे नाही की, हॉस्पीटल मध्ये असतांना इन्श्युरन्स क्लेमची चौकशी केली. हे मला आता आठवत नाही की, डॉ. कपाडिया हॉस्पीटलचे कागदपत्र पोलिसांना दिले किंवा नाही. कापडिया हॉस्पीटलमध्ये मला डॉक्टरांनी काहिच विचारले नाही. डॉक्टर कपाडिया यांनी मला जबाब देण्याच्या स्थितीत आहे किंवा नाही असे मला विचारले नव्हते. हे मला माहित नाही की, माझया सोबत असणा-या व्यक्तीने मला जे सांगितले त्यावर मी विश्वास ठेवला. मला धडक देणा-या गाडीचा नंबर मी बघितला होता.

पोलिसांनी मला हा प्रश्न विचारला नाही की, त्या गाडीचा नंबर, रंग काय आहे हे मला विचारले नाही. मी पोलिसांकडे चौकशी केली नाही की, सदर गाडीचा मालक कोण आहे. बाबासाहेब भाउसाहेब आडुळे यांना मी ओळखत नाही. दिनांक २२.०७.२०१४ रोजी मी पोलिसांना काहितरी सांगत होतो . पोलिस लिहुन घेत होते. हे म्ळणणे खरे आहे की, दिनांक २२.०७.२०१४ मी पोलिसांना सर्व सांगितले व त्यानंतर त्यांनी लिहुन घेतले. हे म्हणणे खरे दिनांक २०.०७.२०१४ रोजी माझी व पोलिसांची भेट झाली हे आता मला आठवत नाही. दिनांक २०.०७.२०१४ रोजी मी पोलिसांकडे गेलो नाही. दिनांक २१.०७.२०१४ रोजी माझे व पोलिसांचे बोलणे झाले हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१.०७.२०१४ रोजी माझी तब्येत बरी नसल्याने पालिसांसोबत माझे बोलणे झाले नाही.

४) दिनांक २२.०७.२०१४ रोजी वेरुळ करुन औरंगाबादकडे येत होतो ही बाब मी पोलिसांना सांगितली होती. ही बाब माझया जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. दिनांक २२.०७.२०१४ रोजी मी व मुलगी एका बाजुला व पत्नी एका बाजुला पडलोॆ. व ते वाहन मी पालहले. सदर बाब, पोलिसांनी मला विचारली नाही व मी सांगितली नाही. हे मला आठवत नाही की, माझे दोन्ही हाताचे मनगट dislocate झझाल्ै ळझैते ही बाब मी पोलिसांना सांगितली होती. दिनांक २०.०७.२०१४ ते २२.०७.२०१४ किती अंगठे पोलिसांनी घेतले हे मला आठवत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की आठवत नाही म्हणजे एकाही कागदावर अंगठा घेतला नाही. माझया मुलीच्या कपाळावर डाव्या बाजुच्या भुवईवर मार लागला, माझया पत्नीला व मुलीला टाके पडले होते ही बाब मी पोलिसांना सांगितली होती. सदर बाब माझया जाबाबात का नमुद नाही. हे मला माहित नाही की, ज्या गाडीने मला धडक दिली त्याचा मालक आरोपी नाही. हे म्हणणे खरे नाही की, बाबासाहेब भाउराव आटुळे याच्या सांगण्यानुसार आरोपीचे नाव सांगितले. हे मला माहित नाही की, आरोपी हा गाडी चालवत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणत्याही उद्वेशने सदरचा अपघात घडवुन आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणत्याही उद्वेशाने बेजबाबदार, निष्काळजी, बेधडकपणाने अपघात घडवुन आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणत्याही उद्वेशने सदरचा अपघात घडवुन आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणत्याही उद्वेशाने बेजबाबदारपणे,

निष्काळजीपणे, बेधडकपणाने तुम्हाला दुखापत व ईजा होईल म्हणुन कोणताही अपघात घडवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, इन्श्युररन्स क्लेम पास होण्यासाठी चुकीची फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, माझया सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे ना की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती.**

Digitally signed by SNEHAL SHANKAR JADHAV
Date: 2025.08.28 10:56:27 +0530

**दिनांक -२५.०८.२०२५**

**ठिकाणी - औरंगाबाद**

**(स्नेहल एस. जाधव)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**(न्यायालय क्र.१३), औरंगाबाद**